P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक - ११/११/२०२३

## दि.१०/११/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ९४१/२०२३ भादवि कलम ३९४, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/११/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा. ते ०३.०० वा. चे सुमारास मौजे वाकी ता.खेड जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/११/२०२३ रोजी १९/५१ वा |
| फिर्यादी | :- | लखन शांतीलाल कणसे वय २८ वर्षे व्यवसाय नोकरी रा. के जी एन यु पी व्हि सी प्रा. लि. कंपनीचे रुममध्ये बाकी ता.खेड जि.पुणे मुळ रा. लिपनगांव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर |
| आरोपी | :- | १) अरुण नागनाथ धोत्रे वय २१ वर्षे रा. शिरवली ता.खेड जि.पुणे<br>२) कृष्णा तिडके<br>३) सचिन पांडूरंग वखरे पुर्ण नांव पत्ता माहित नाही.<br>**आरोपी क्र १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीचे मित्र आनंद शर्मा, टारझन शर्मा, किष्णा सहानी, सुशिल सहानी असे गप्पा मारत बसलेले असतांना नमुद आरोपी क्र १ व त्याचे साथीदार आरोपी क्र २ व ३ यांनी फिर्यादीचे रुममध्ये येवुन त्यांना चाकुचा धाक दाखुन बेल्ट, रस्सी, पाणी गरम करण्याचे हिटरने मारहाण करुन फिर्यादी व फिर्यादीचे मित्र यांचे अंगावर मिरची पावडर टाकुन १)फिर्यादी यांचे ३००/- रु २)कृष्णा सहानी कडील १२,०००/- रु किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल व ३)सुशील सहानी कडील ५,०००/- रु किंमतीचा रेडमी कंपनीचा मोबाईल आणि ५०,०००/- रु किंमतीची सुशील सहानी याचे ताब्यात असलेली हिरो होंडा पॅशन प्रो मो सायकल असा एकुण ६७,३००/- रुपये किंमतीचे मोबाईल फोन, मोटार सायकल नंबर एम एच १९ डि एच ४५८५ व रोख रक्कम ३००/- रुपये जबरदस्तीने चोरी करुन घेवून गेले आहेत. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ९६८९३२३१२३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०९४/२३ भा.दं.वि कलम ३०८, ५०४, ५०६ आर्म ॲक्ट ४ (२५) महाराष्ट्र पोलीस अधि. कलम ३७(१)(३) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/११/२०२३ रोजी २२/३० वा. चे सुमा. क्रंतिवीर नगर थेरगाव पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१०/११/२०२३ रोजी ०३.४४ वा |
| फिर्यादी | :- | विनोद रमेश बारणे वय.३३ वर्षे धंदा-ट्रान्सपोर्ट रा. संचेती शाळे समोर क्रंतिवीर नगर थेरगाव पुणे |
| आरोपी | :- | अभिजीत शिवाजी बारणे, वय ३३ वर्षे, धंदा - व्यवसाय, रा. संचेती शाळे समोर क्रंतिवीर नगर थेरगाव पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे चुलत भाऊ नमुद आरोपी याने काही कारण नसतांना त्याची चारचाकी गाडी नं. एमएच/१४/एफएम/९०९९ ही फिर्यादीचे अंगावर घातली सदर कारचा धक्का लागल्याने फिर्यादी खाली पडले व दोन्ही गुडग्यांना मार लागुन रक्त येऊ लागले. त्याबाबत फिर्यादीने आरोपी यास विचारणा केली असता आरोपीने रागाचे भरात शिवीगाळ करुन तसेच जिवे मारण्याची धमकी देऊन त्यांच्या कार मधिल लोखंडी कोयता हा फिर्यादीचे दिशेने मारला ते फिर्यादीचे डावे हाताचे जवळ लागला व रक्त येवु लागले, सदर कोयता हा |

फिर्यादीचे डोक्याच्या दिशेने मारला होता. पंरतु फिर्यादीने हात मध्ये घातल्याने तो हाताला लागुन खाली पडला, तरी सदर कोयता फिर्यादीचे डोक्यात लागला असता तर फिर्यादीचा जिव गेला असता हे माहित असतांना देखील नमुद आरोपी याने जाणीवपूर्वक कोयता मारुन जखमी केले व फिर्यादी खाली पडले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि गिरनार ९८८१०९७७१९

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ७३७ /२०२३ भादवि कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, मो.वा का कलम १८४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०९/११/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा चे सुमारास नव महाराष्ट्र शाळे जवळ खराबवाडी चाकण तळेगाव रोडवर ता खेड जि पुणे

गुन्हा दाखल :- दि १०/११/२०२३ रोजी १३.५५वा

फिर्यादी :- संदीप बाळासाहेब पुंडे वय ३४ वर्षे धंदा नोकरी रा रमेश पाटील यांचे रुममध्ये भाड्याने झिआई मळा चाकण ता खेड जि पुणे

आरोपी :- चिमणसिंह हजारी सिंग राजपुत वय ३४ राहणार गाव बरार तालुका बिबं जिल्हा साजतरमन राज्य राजस्थान **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी त्याच्या ताब्यातील ट्रक हयगयीने ,बेदरकारपणे रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून भरगाव वेगाने चालवून फिर्यादी यांची हिरो कंपनीची स्प्लेंडर गाडी मोटार सायकल नंबर एम एच १७ सी वाय ६८२९ हीस समोरून धडक देऊन अपघात करून अपघातामध्ये फिर्यादीचे उजव्या पायास फ्रॅक्चर तसेच डोक्यास मार लागून जखमी केले तसेच फिर्यादीचा मित्र नीरजकुमार याचे उजव्या पायास फ्रॅक्चर करून डोक्यात व छातीस व उजव्या हाताचे मनगटाजवळ मार लागून जखमी केले तसेच फिर्यादीचे मोटर सायकलीचे नुकसान केले आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा शेळके ७५०७७३६८३७

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ५७४/२०२३ भा.द.वि.कलम ४२०, ४१९,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १०/११/२०२३ रोजी सकाळी १०:०० वा सुमारास शंकरवाडी येथे हॉटेल सुवर्णा लॉजिंग जवळ जुना पुणे मुंबई हायवे रोडच्या कडेला ता मावळ जि पुणे

गुन्हा दाखल :- दि.१०/११/२०२३ वेळ .१३/५७वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी वय ७० वर्षे

आरोपी :- दोन अनोळखी इसम

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हया त्यांचे चहाचे टपरीवर असतांना यातील दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन फिर्यादी यांना सांगीतले की आम्हाला मंदीरात जायचे आहे मारुतीचे मंदीर कोठे आहे असे बोलुन फिर्यादीला त्यांचे पिशवीत फिर्यादी कडील बिस्कीट टाकण्यास सांगुन नंतर गळयातील ७०,०००/- रू किमतीचे गंठन सदर आरोपी यांच्या पिशवीत टाकण्यास सांगीतले फिर्यादी यांनी त्यांचे गंठण आरोपी यांचे पिशवीत ठेवले असता आरोपी यांनी ते स्वतजवळ ठेवुन वाळु व माती बांधलेले कापडे फिर्यादी यांच्या हातात देवुन फिर्यादी यांची बतावणी करून फसवणुक केली व मोटार सायकल वरून पळुन गेले आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि वारे ९९२१६१७१४५

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ६६४ /२०२३ भा.दं.वि.कलम४०६, ४२०, ४०९, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १७/०७/२०१९ रोजी हॉटेल नवमी, थॅरमॅक्स चौक, संभाजीनगर चिंचवड येथे

गुन्हा दाखल :- दि १०/११/२०२३ रोजी २१ .५३ वा

फिर्यादी :- गिरीष नवनाथ आव्हाड वय.४७वर्ष धंदा-व्यवसाय व जमीन खरेदी व्रिकीरा. ५२४ दत्तसुधा सिंध हौ.सोसायटी बाणेर रोड औंध पुणे

आरोपी :- १) विशाल चुगेरा रा.वानवडी पुणे
२) शिवम बनवारीदास महंत रा.वडगाव शेरी पुणे
३) मनोज सरसनाथ राय रा.पिंपरी पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना नमुद आरोपी यांनी कमी रक्कमेमध्ये प्लॉट विकत घेवून जास्त नफा कमवून देण्याचे आमीष दाखवून २०५०० चौ.मी क्षेत्र खरेदी देण्याचे मान्य करून १,२९,५०,०००/-रू (एक कोटी २९ लाख पन्नास हजार रूपये) घेवून खरेदी करून देण्याचे भासवून कच्चा करारानामा व प्लॉट नंबर ईमेल पाठवून विश्वास संपादन करून प्लॉट खरेदी करून न देता तसेच दिलेली रक्कम परत न देता विश्वासघात करून फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि केकान ९४२१०४९६२३

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ५५५/२०२३ भा.दं.वि.कलम ४५४, ४५७, ३८०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०५/११/२०२३ रोजी रात्रौ २१/३० वा ते दि.०६/११/२०२३ रोजी सकाळी ०९/३० वा चे सुमारास जमुना ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन लिमिटेड पत्ता. ॲग्रीकल्चर संकुल समोर, बोहाडेवस्ती, मोशी, पुणे येथे घडला

गुन्हा दाखल :- दि १०/११/२०२३ रोजी २२/३८ वा

फिर्यादी :- राकेश पदमाकर नगरकर वय ५० वर्षे धंदा- व्यवसाय,रा हिरकणी हाऊसिंग सोसायटी शिव पार्वती अपार्टमेंन्ट महालक्ष्मी स्टोअर जुनी सांगवी पिंपरी चिचवड,पुणे

आरोपी :- अज्ञात आरोपी

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे जमुना ट्रान्सपोर्ट कार्पोरेशनच्या यार्ड ऑफिसचे लॉक तोडुन १,६२,०००/- रु किंमतीचे अपोलो कंपनीचे ट्रेलरचे ०९ टायर, २२,०००/-रु किंमतीचे एक्साईड कंपनीचे ०६ बॅट-या असा एकुण १,८४,०००/-रु चा माल घरफोडी करुन चोरी करुन नेल्या आहेत म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा लोखंडे, ९०४९८१८२४०

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ११०६/२३ , भादवि कलम ४०६,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १०/११/२०२३ रोजी १३/४० वा ते १४/०० वा चे दरम्यान पिंपरी गाव पुणे येथे मोबाईलवर

गुन्हा दाखल :- दि १०/११/२०२३ रोजी २३/४७ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १)ग्रेसी डेनिस देवनसन वय १८ वर्षे रा सदर २)निखील धुधाजी डोंगरे वय १८ रा कोळेवाडी पिपरी पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी नं १ ही फिर्यादीची मुलगी असुन फिर्यादीने आरोपी न १ हिच्या कडे स्वतचा मोबाईल हॅण्डसेट विश्वासाने फोन करणे करिता दिला असता सदर आरोपी नं १ हिने आरोपी नं २ याचे मदतीने मोबाईल हॅण्ड सेटचा वापर करुन यु एन टी आय डी व्दारे बडोदा बँक शाखा चिंचवड या बँकेचे खाते क्र ८९७२०१००००४९७४ या खात्यातील फिर्यादी यांचे ५०,०००/- रुपये आरोपी क्र १ हिने तिचा मित्र तेजस तुलसानकर याचे गुगल फोन पे या अकाउंटवर पाठवुन सदर रकमेचा अपहार केला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि घाडगे, ९६५७००२०९०

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३८२/२०२३ भा.द.वि. कलम २३८,१८८,३३६. महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (१)(यु) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/११/२०२३ रोजी १६.३० वा.चे सुमारास भालचंद्र विहार चौकाचे जवळ बी.आर.टी.रोड ते मस्केवस्ती जाणारे रोडचे डावे बाजुस |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/११/२०२३ रोजी २१.३४ वा |
| फिर्यादी | :- | संजय गणपत आंधळे वय ३८ वर्षे, पोलीस शिपाई २५७७, रावेत पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| आरोपी | :- | सोहम राजु चंदोलिया वय २३ वर्षे रा. जाधववस्ती रावेत ता.हवेली जि.पुणे.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने ओमसाई फटाका स्टॉलमध्ये फटाका विक्रीचा कोणताही परवाना नसताना, ज्वलनशील पदार्थ (फटाके) मांडुन त्याची विक्री करीत असताना की, ज्यामुळे मानवी जिवन धोक्यात येईल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहचण्याचा धोका संभवता येईल इतक्या बेदरकारपणे हयगयीने सदर ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जिवीतास पोहचणा-या संभावी धोक्यापासुन सुरक्षीत राहण्या इतपत पुरेसे साहित्य जवळ न ठेवता जाणीवपुर्वक हयगयी करुन शासनाने घालुन दिलेल्या नियम व अटींचे पालन न करता फटाकयांची विक्री करताना मिळुन आला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि टार्फे, ७२७६८६४४८४ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५७५/२०२३ महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे)झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ व सुधारणा अधि. २०२१ चे कलम २१(१) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०१/०८/२०२० ते दि.१०/०८/२०२० रोजी दरम्यान त्यांचे राहते जागेतील राज गूरव काँलनी, तळेगाव दाभाडे ता.मावळ जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/११/२०२३ रोजी वेळ २०.३५ वा. |
| फिर्यादी | :- | सिध्देश्वर भगवान महाजन वय ४१ वर्षे नेमणूक तळेगाव दाभाडे नगरपरिषद येथे उदयान पर्यवेक्षक रा. साई सिटी फलॅट क्र.डी/८, खंडोबा माळ, राजगूरू नगर, ता.खेड जि.पुणे |
| आरोपी | :- | महिला आरोपी , **अटक नाही .** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी त्यांचे राहते जागेतील नारळ-०१, डाळींब-०१, आंबा-०१, बाभुळ-०२, प्राजक्त ०१, पाल्म-०३, जास्वंद ०१ अशी एकूण १० झाडे नगरपालीकेची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररित्या तोडली असून त्याबाबतचा नगरपालिकेने केलेला दंड त्यांनी भरलेला नाही. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शिंपणे, ९८५०२५५२५९ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०९६/२३ भा.द.वि.कलम २७८, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५, महानगर पालिका अधिनियम कलम ३७६ (अ)(ब) सह जलप्रदुषण अधिनियम १९७४ चे कलम २४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/११/२०२३ रोजी १०/४५ वा.चे पुर्वी पासुन नक्की तारीख वेळ माहिती नाही. २४ क्लेन मे.क्लिनफॅब सर्व्हिसेस एल.एच.पी.चे मालक अभिषेक टंकारिया रा. सर्व्हे नं. १७४/०५, औंध रावेत बी. आर. टी. रोड, पवार वस्ती, ताथवडे पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/११/२०२३ रोजी १९ / १० वा. |
| फिर्यादी | :- | अमोल गणपत गोरखे, वय-४८ वर्षे, धंदा-नोकरी कामकाजाचा पत्ताः पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, पिंपरी चिंचवड महानगर पालिका |
| आरोपी | :- | अभिषेक टंकारिया रा.सर्व्हे नं.१७४/०५, औंध रावेत बी. आर. टी. रोड, पवारवस्ती, ताथवडे पुणे २४ क्लेन मे. क्लिनफॅब सर्व्हिसेस एल. एल. पी. लॉन्ड्री, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे मालकीचे २४ क्लेन मे.क्लिन फॅब सर्व्हिसेस एल.एल.पी.पत्ता सर्व्हे नं.१७४/०५, औंध रावेत बी.आर. टी.रोड, पवारवस्ती, ताथवडे पुणे या लॉन्ड्री दुकानातील केमिकलयुक्त दुषित पाणी हे ड्रेनेजदवारे पवना नदीच्या पात्रात पाण्यावर कोणतीही शुदधीकरण प्रकिया न करता सोडुन नदीचे पाणी दुषित करून जलचर प्राण्याच्या जीवितास व मानवी जीवितास धोका उत्पन्न केला आहे म्हणुन. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि नाईकनिंबाळकर, ९८८१२५२९३० |